# वार्तापत्र

पोलीस अधिक्षक कार्यालय,
गडचिरोली दिनांक ०९/११/२०१७

दिनांक ०९/११/२०१७ रोजी अवैध दारु विक्री संबंधात गोपनिय सुत्राकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक प्रदिप रामनाथ लांडे स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली यांचे मागदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली येथील पोउपनि युवराज घोडके, सोबतचे पथकातील दादाजी करकाडे, भाऊराव बोरकर, दुधराम चवारे, प्रशांत पातकमवार, दुर्गा साखरे, वैशाली चव्हाण अशा प्रकारचा पोलीस पथक मौजा कोटगल येथे पोहचुन स्थानिक अवैध दारु विक्रेती महिला नामे चित्रा प्रकाश यादव रा. कोटगल ता.जि. गडचिरोली हिचे मालकिचे राहते घरी अवैध दारु संबंधाने घरझडती घेतली असता, तिचे राहते घरी मधले खोलीचे एका कोपऱ्यात जमीनीत खड्डा खोदून त्याठिकाणी विदेशी दारु तसेच एका कोपऱ्यात प्लॉस्टिक चुंगळयामध्ये देशी दारु अवैध विक्री करण्याचे उद्देशाने बाळगली असल्याचे मिळून आली

१. किंमत:- ९०००/- रु. इंम्पेरियल ब्ल्यु व्हिस्की कंपणीच्या ३० सिलबंद निपा

२. किंमत:- २९,४००/- रु. देशी दारु सुप्रीम सॉनीक रॉकेट कंपणीच्या प्रत्येकी ९० मिली क्षमतेच्या ४९० सिलबंद निपा

असा प्रकारे एकुण २९,४००/- रुपयाचा मुद्देमाल घटनास्थळावरुन जप्त करण्यात आला असून यातील महिला हि वरील प्रमाणे नमुद किंमतीची देशी/विदेशी दारु अवैध विक्री करण्याकरीता स्वत:चे घरी ताब्यात बाळगुन असल्याचे मिळून आल्याने तिचे विरुध्द पोलीस स्टेशन गडचिरोली येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम ६५ (ई) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

–

